## सोनू सूदला कारवाईतून तात्पुरता दिलासा

**मुंबई :** बेकायदा बांधकामप्रकरणी पालिकेच्या कठोर कारवाईपासून अभिनेता सोनू सूदला कनिष्ठ न्यायालयाने दिलेला दिलासा उच्च न्यायालयाने १३ जानेवारीपर्यंत कायम ठेवला.

सोनूने परवानगीशिवाय घराच्या मंजूर आराखड्यात बदल केल्याचा व सहा मजली निवासी इमारतीचे हॉटेलमध्ये रूपांतर केल्याचा पालिकेचा आरोप आहे. त्याची दखल घेत तुम्ही शुद्ध हेतूने न्यायालयात आला असाल तर ठीक, अन्यथा त्याचे परिणाम भोगावे लागतील, असा इशारा न्यायालयाने सोनूला दिला.

सोनूने कनिष्ठ न्यायालयात धाव घेत पालिकेची नोटीस रद्द करण्याची मागणी केली होती. कनिष्ठ न्यायालयाने मात्र त्याची ही मागणी फेटाळली होती. सोनूने कनिष्ठ न्यायालयाच्या निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. त्याच्या याचिकेवर सोमवारी सुनावणी झाली. त्या वेळी पालिकेच्या वतीने ॲड. अनिल साखरे यांनी याचिकेवर उत्तर दाखल करण्यासाठी वेळ मागितला. त्यानंतर सोनूचे वकील अमोघ सिंह यांनी कारवाईपासून अंतरिम संरक्षण देण्याची मागणी न्यायालयाकडे केली. न्यायमूर्ती पृथ्वीराज चव्हाण यांनी पालिकेला याचिकेवर उत्तर दाखल करण्यासाठी १३ जानेवारीपर्यंत वेळ दिली.शक्तीसागरमध्ये २४ घरे आहेत. त्यात बदल करून त्याचे हॉटेलच्या खोल्यांमध्ये रूपांतर करण्यात आले आहे. पालिकेने या बांधकामांवर २०१८ आणि फेब्रुवारी २०२० अशी दोन वेळा कारवाई केली. त्यानंतरही सोनूने बेकायदा बांधकाम सुरूच ठेवले. त्यामुळेच सोनूविरोधात पोलिसांत तक्रार करण्यात आल्याचेही पालिकेच्या वतीने न्यायालयाला सांगितले.

# सागरी मार्गावरील बोगद्याचे काम सुरू

### आठ महिन्यांत दोन बोगदे उभारण्याचे लक्ष्य

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** मुंबई महापालिकेचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सागरी किनारा मार्गातील मलबार हिल टेकडी, गिरगाव चौपाटी खालून समांतर असे दोन भुयारी मार्ग उभारण्याच्या कामाला सोमवारपासून सुरु वात झाली.

बोगद्यांच्या खोदकामासाठी चीनमधून आयात केलेल्या भव्य यंत्राची कळ दाबून मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते या कामाला सोमवारी सुरुवात करण्यात आली. १२.१९ मीटर व्यासाच्या या अवाढव्य यंत्राच्या साहाय्याने दीड वर्षात दोन बोगदे खोदण्यात येणार आहेत.

प्रिन्सेस स्ट्रीट ते वांद्रे-वरळी सागरीसेतूच्या दक्षिण टोकापर्यंत पालिकेतर्फे १०.५८ किमी लांबीचा सागरी किनारा मार्ग उभारण्यात येत आहे. ऑक्टोबर २०१८ मध्ये सुरू झालेला हा प्रचंड मोठा व गुंतागुंतीचा प्रकल्प असून न्यायालयाने स्थगिती दिल्यामुळे व टाळेबंदीमुळे या प्रकल्पाचे काम रखडले होते. आता या कामाने वेग घेतला आहे. या प्रकल्पाचे एकू ण तीन टप्प्यांपैकी प्रिन्सेस स्ट्रीट उड्डाणपूल ते प्रियदर्शिनी पार्क दरम्यान बोगदे खोदण्यात येणार आहेत.

**मुख्यमंत्र्यांकडून कौतुक**

करोनाच्या लढाईत जगाने दखल घ्यावी असे काम मुंबई महानगरपालिकेने केले आहे. आता ही विकासाची लढाई सुरू झाली असून या लढाईत अनेक 'मावळ्यां'ची कामगिरी महत्त्वाची ठरेल, असे उद्गार उद्धव ठाकरे यांनी काढले. पालिके ने के लेल्या नियोजनाबद्दल मुख्यमंत्र्यांनी कौतुक केले.



मुंबई महापालिकेचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असलेल्या सागरी किनारा मार्गातील प्रियदर्शनी पार्क ते मरिन ड्राइव्हदरम्यान उभारण्यात येणाऱ्या भुयारी मार्गाच्या कामास सोमवारी सुरुवात करण्यात आली. चीनमधून आयात केलेल्या महाकाय यंत्राची कळ दाबून मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी बोगद्यांच्या कामास सुरुवात होत असल्याचे जाहीर केले. यावेळी राज शिष्टाचारमंत्री आणि पर्यावरण व पर्यटनमंत्री आदित्य ठाकरे, तसेच पालिका आयुक्त इक्बाल सिंह चहल, अतिरिक्त आयुक्त अश्विनी भिडे आणि पालिका अधिकारी उपस्थित होते.

**प्रकल्पाची वैशिष्ट्ये**

- प्रस्तावित किनारी रस्ता प्रकल्पात ४ + ४ मार्गिका, भरणीवरील रस्ते, पूल, उन्नत रस्ते आणि बोगदे आहेत.
- प्रकल्प तीन टप्प्यात विभागलेला आहे.
- प्रिन्सेस स्ट्रीट फ्लायओव्हर ते प्रियदर्शिनी पार्क (४.०५ कि.मी.)
- प्रियदर्शिनी पार्क ते बडोदा पॅलेस (३.८२ कि.मी.)
- बडोदा पॅलेस ते वांद्रे वरळी सी लिंक (२.७१ कि.मी )
- किनारा मार्गाची एकूण लांबी १०.५८ कि.मी.
- बोगद्याची लांबी प्रत्येकी २.०७२ कि.मी. आहे.

**लोकप्रतिनिधींना डावलले?**

सोमवारी झालेल्या कार्यक्रमाला मुख्यमंत्र्यांसोबत, राज शिष्टाचार मंत्री आणि पर्यावरण व पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे, तसेच पालिका आयुक्त इक्बाल सिंह चहल, अतिरिक्त आयुक्त अश्विनी भिडे आणि पालिकेचे अधिकारी उपस्थित होते. पालिकेचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असूनही या कार्यक्रमाला महापौर, विरोधी पक्षनेते, गटनेते यांना बोलावण्यात आले नव्हते. या कार्यक्रमाबद्दल आपल्याला काहीच माहिती नव्हते, हा कार्यक्रम आयुक्तांचा खासगी कार्यक्रम होता का असा खोचक सवाल विरोधी पक्षनेते रवी राजा यांनी केला आहे.

**अवाढव्य 'मावळा'**

बोगद्याच्या खोदकामासाठी आयात केलेल्या १२.१९ मीटर व्यासाच्या यंत्राचे 'मावळा' असे नामकरण करण्यात आले असून त्यांची उंची इमारतीच्या तीन मजल्यांइतकी आहे. या यंत्राचे वजन २३०० टन म्हणजे ८ जम्बो जेट विमानांच्या वजनाइतके याचे वजन आहे. हे भारतातील आतापर्यंतचे सर्वात मोठ्या व्यासाचे टीबीएम यंत्र आहे.

# अकरावीच्या प्रथम प्राधान्य फेरीसाठी सव्वा लाख जागा

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** मुंबई आणि महानगर परिसरातील कनिष्ठ महाविद्यालयांत अकरावीच्या जवळपास सव्वा लाख जागा रिक्त असून या जागांवरील प्रवेशासाठी प्रथम येणाऱ्यास प्राधान्य तत्त्वावर प्रवेश फेरी सुरू करण्यात आली आहे.

अकरावीच्या नियमित तीन प्रवेश फेऱ्या आणि दोन विशेष फेऱ्या अशा एकूण पाच फेऱ्यांनंतर मुंबई आणि परिसरातील महाविद्यालयांमध्ये एक लाख ९६ हजार १३६ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. एकूण तीन लाख २० हजार ३९० जागा उपलब्ध होत्या. एकूण पाच फेऱ्यांनंतरही रिक्त राहिलेल्या जागांसाठी प्रथम येणाऱ्यास प्राधान्य तत्त्वावर प्रवेश फेरी होणार आहे. या फेरीसाठी मुंबई आणि महानगर परिसरातील कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये अकरावीच्या एक लाख २४ हजार २५४ जागा उपलब्ध आहेत. बुधवारपासून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेनुसार नऊ टप्प्यांत या फेरीतील प्रवेश करण्यात येणार आहेत. आतापर्यंत प्रवेश न मिळालेले विद्यार्थी, अर्ज न केलेले विद्यार्थी किंवा प्रवेश प्रक्रियेतून बाहेर पडलेले, मिळालेले प्रवेश रद्द केलेले विद्यार्थी या फेरीत सहभागी होऊ शकतील. अकरावीला प्रवेश घेण्याची ही शेवटची संधी असणार आहे. जानेवारी अखेरपर्यंत सर्व प्रक्रिया पूर्ण होणार आहे.

**प्रवेश प्रक्रिया कशी?**

- १३ ते १५ जानेवारी - ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळालेले विद्यार्थी
- १६ ते १८ जानेवारी - ८० ते १०० टक्के गुण मिळालेले विद्यार्थी
- १९ आणि २० जानेवारी - ७० ते १०० टक्के गुण मिळालेले विद्यार्थी
- २१ आणि २२ जानेवारी - ६० ते १०० टक्के गुण मिळालेले विद्यार्थी
- २३ ते २५ जानेवारी - ५० ते १०० टक्के गुण मिळालेले विद्यार्थी
- २७ आणि २८ जानेवारी - दहावी उत्तीर्ण झालेले सर्व विद्यार्थी
- २९ आणि ३० जानेवारी - एटीकेटी मिळालेले विद्यार्थी

**प्रवेश आणि रिक्त जागांची स्थिती**

| शाखा | उपलब्ध जागा | प्रवेश | रिक्त जागा |
|---|---|---|---|
| कला | ३७ हजार ३०० | १९ हजार ३४६ | १७ हजार ९५४ |
| वाणिज्य | १ लाख ७३ हजार ५२० | १ लाख ११ हजार २११ | ६२ हजार ३०९ |
| विज्ञान | १ लाख ३ हजार ९१० | ६३ हजार ३०० | ४० हजार ६१० |
| एचएसव्हीसी | ५ हजार ६६० | २ हजार २७९ | ३ हजार ३८१ |
| एकूण | ३ लाख २० हजार ३९० | १ लाख ९६ हजार १३६ | १,२४,२५४ |

## ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ प्रा. शशिकुमार चित्रे यांचे निधन



**मुंबई :** ज्येष्ठ गणितज्ज्ञ आणि खगोलशास्त्रज्ञ शशिकुमार मधुसूदन चित्रे यांचे सोमवारी मुंबई येथे निधन झाले. ते ८४ वर्षांचे होते. सूर्य आणि त्याचे चुंबकीय क्षेत्र हा त्यांच्या संशोधनाचा विषय होता.

खगोलशास्त्रातील विद्यार्थीप्रिय प्राध्यापक म्हणून चित्रे यांची ओळख होती. सौर भौतिकशास्त्र आणि खगोल भौतिकशास्त्र हे त्यांच्या अध्यापनाचे आणि संशोधनाचे विषय होते. सौर डाग, सूर्याचे प्रभामंडळ आणि त्याचे चुंबकीय क्षेत्र यांवर त्यांनी संशोधन केले. त्यांना २०१२ मध्ये पद्मभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला.

चित्रे यांचा जन्म १९३६ मध्ये झाला. मुंबईच्या एल्फिन्स्टन महाविद्यालयांतून गणित विषयात पदवीपर्यंतचे शिक्षण त्यांनी पूर्ण केले. यानंतर परदेशी शिक्षणासाठीची मानाची 'ड्यूक एडिन्बर्ग' शिष्यवृत्ती मिळाली. त्यानंतर केंब्रिज विद्यापीठात पुढील शिक्षण घेतले. त्यांनी काही काळ लीड्स विद्यापीठात अध्यापन केले. त्यानंतर कॅलिफोर्निया इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथेही त्यांनी संशोधनाचे काम केले. चित्रे हे १९६७ मध्ये भारतात परतले आणि मुंबईच्या टाटा मूलभूत संशोधन संस्थेमध्ये रुजू झाले. २००१ मध्ये निवृत्त होईपर्यंत ते याच संस्थेत कार्यरत राहिले. मुंबई विद्यापीठाच्या सेंटर फॉर एक्सलन्स इन बेसिक सायन्सेस याच्या उभारणीतही त्यांचे मोठे योगदान आहे. तेथे त्यांनी अखेरच्या श्वासापर्यंत अध्ययनाचे काम केले. नेहरू विज्ञान केंद्र, जे. एन. टाटा ट्रस्ट, ॲस्ट्रॉनॉमिकल सोसायटी ऑफ इंडिया यांसह विज्ञान, भौतिकशास्त्र, खगोलशास्त्र या क्षेत्रातील अनेक संस्थांचे ते पदाधिकारी होते.

# कंगनाला चौकशीला बोलावू नका

### देशद्रोहाच्या आरोपप्रकरणी उच्च न्यायालयाचे आदेश

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** देशद्रोहाच्या आरोपप्रकरणी अभिनेत्री कंगना राणावतला सध्या तरी चौकशीसाठी बोलावले जाऊ नये, असे आदेश उच्च न्यायालयाने सोमवारी दिले. तसेच हे एकच प्रकरण नाही, तर अन्य प्रकरणांची चौकशी करा, असे न्यायालयाने पोलिसांना सुनावले आणि देशद्रोहाचा आरोप लावल्याबाबत पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

कंगना आणि तिची बहीण रंगोली यांनी समाजमाध्यमावरून वारंवार दोन समुदायात तेढ निर्माण करणारी वक्तव्य केल्याप्रकरणी चित्रपटसृष्टीशी संबंधित साहिल अश्रफ अली सय्यद यांनी तक्रार केली होती. तसेच दोघींवर देशद्रोहाच्या आरोपप्रकरणी कारवाईची मागणी केली होती. महानगरदंडाधिकाऱ्यांनी त्यांच्या



तक्रारीची दखल घेत कंगना आणि रंगोलीविरोधात चौकशी करण्याचे आदेश पोलिसांना दिले होते. दोघींनी उच्च न्यायालयात धाव घेत देशद्रोहाचा आदेश रद्द करण्याची, तसेच पोलिसांना कठोर कारवाई करण्यापासून मज्जाव करण्याची मागणी केली होती.

न्यायमूर्ती एस. एस. शिंदे आणि न्यायमूर्ती मनीष पितळे यांच्या खंडपीठासमोर तिच्या याचिकेवर सोमवारी सुनावणी झाली. त्यावेळी न्यायालयाच्या आदेशानुसार कंगना ८ जानेवारीला दुपारी एक ते तीन या वेळेत चौकशीसाठी वांद्रे पोलिसांसमोर हजर झाल्या. मात्र चित्रीकरणाचे कारण सांगून कंगना तिथून निघून गेली. त्यामुळे तिची चौकशी अपूर्ण आहे. त्यामुळे तिला पुन्हा चौकशीसाठी बोलावायचे आहे. सहकार्य करण्यात काय गैर आहे, असे सरकारी वकील दीपक ठाकरे यांनी न्यायालयाला सांगितले.

त्यावर तिची दोन तास चौकशी पुरेशी नाही का, सहकार्यासाठी आणखी किती तास तुम्हाला हवे आहेत, असा प्रश्न न्यायालयाने पोलिसांना केला. तेव्हा आणखी तीन दिवस तरी चौकशीसाठी हवे असल्याचे पोलिसांतर्फे सांगण्यात आले. शिवाय या प्रकरणाशी संबंधित ट्वीट करण्यापासून न्यायालयाने मज्जाव करूनही चौकशीनंतर कंगनाने ट्वीट केल्याची तक्रार पोलीस आणि मूळ तक्रारदाराच्या वतीने न्यायालयाकडे करण्यात आली.


**LARSEN & TOUBRO LIMITED**

Regd. Office: L&T House, Ballard Estate, Mumbai 400 001.
CIN: L99999MH1946PLC004768
Tel No: 022-67525656
Fax No.: 022-67525893
Email: lgrc@Larsentoubro.com
website: www.Larsentoubro.com

**NOTICE**

Pursuant to Regulation 29 read with Regulation 47 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, NOTICE IS HEREBY GIVEN THAT a Meeting of the Board of Directors of the Company will be held on **Monday, 25th January 2021**, inter-alia, to consider and approve the unaudited financial results of the Company for the quarter and nine months period ended **31st December 2020.**

This information is also available on the website of the Company at **www.larsentoubro.com** and on the website of the Stock Exchanges where the shares of the Company are listed at **www.bseindia.com** and **www.nseindia.com**

For **LARSEN & TOUBRO LIMITED**
**SIVARAM NAIR A.**
**COMPANY SECRETARY**
**(FCS 3939)**

**Date: 11th January 2021**



25

**महानगर गॅस लिमिटेड**

सीआयएन: एल४०२००एमएच१९९५पीएलसी०८८१३३
नोंदणीकृत कार्यालय: एमजीएल हाऊस, ब्लॉक जी-३३, वान्द्रे-कुर्ला संकुल, वान्द्रे (पूर्व), मुंबई ४०००५१
दूरध्वनी: +९१ २२ ६६७८५०००
ई-मेल: investorrelations@mahanagargas.com
संकेतस्थळ: www.mahanagargas.com

MAHANAGAR GAS

**सूचना**

सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या विनियम ४७ अन्वये याद्वारे सूचना देण्यात येते की, अन्य गोष्टींबरोबर ३१ डिसेंबर, २०२० रोजी संपलेल्या तिमाहीचे कंपनीचे अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्ष विचारात घेण्यासाठी आणि मंजूर करण्यासाठी **मंगळवार, ०९ फेब्रुवारी, २०२१** रोजी कंपनीच्या संचालक मंडळाची सभा घेण्यात येणार आहे.

सेबी (प्रोहिबिशन ऑफ इन्साइडर ट्रेडिंग) रेग्युलेशन्स, २०१५ अन्वये, सदस्यांद्वारा केल्या जाणाऱ्या रोख्यांच्या खरेदी-विक्री व्यवहाराचे विनियमन, संनियंत्रण आणि प्रतिवेदन करण्यासाठीच्या कंपनीच्या अंतर्गत कार्यपद्धती व आचारसंहितेच्या आवश्यकतांच्या अनुषंगाने, नियुक्त व्यक्तींद्वारा कंपनीच्या रोख्यांच्या खरेदी-विक्रीची ट्रेडिंग विन्डो **३१ डिसेंबर, २०२० (गुरुवार) पासून** वित्तीय निष्कर्ष जाहीर केल्यानंतर ४८ तासांपर्यंत म्हणजेच **११ फेब्रुवारी, २०२१ (गुरुवार) पर्यंत (दोन्ही दिवस धरून) बंद राहील.**

ही सूचना, कंपनीच्या वेबसाइटवर **www.mahanagargas.com** मध्ये आणि कंपनीचे समभाग जिथे सूचिबद्ध आहेत अशा स्टॉक एक्स्चेंजेसच्या वेबसाइटवर म्हणजेच **www.bseindia.com** व **www.nseindia.com** मध्ये सुद्धा पाहता येईल.

**महानगर गॅस लिमिटेड**करिता
स्वाक्षरी/-
**संजीब दत्ता**
व्यवस्थापन संचालक

**दिनांक:** ११ जानेवारी, २०२१
**स्थळ :** मुंबई


# 'बार्क'चे माजी अधिकारी दासगुप्ता मुख्य सूत्रधार

### गोस्वामींशी संगनमताने टीआरपी गैरव्यवहार केल्याचा आरोप, गुन्हे शाखेकडून पुरवणी आरोपपत्र दाखल

लोकसत्ता खास प्रतिनिधी

**मुंबई :** ब्रॉडकास्ट ऑडियन्स रिसर्च काउन्सिलचे (बार्क) माजी मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) पार्थ दासगुप्ता टेलिव्हिजन रेटिंग पॉइंट्स (टीआरपी) घोटाळ्याचे मुख्य सूत्रधार आहेत. पार्थ यांनी एआरजी आउटलायर कंपनीचे संचालक आणि रिपब्लिक वृत्त वाहिनीचे मुख्य संपादक अर्णब गोस्वामी यांच्यासोबत संगनमताने कट रचत टीआरपी घोटाळा केल्याचा आरोप गुन्हे शाखेने पुरवणी आरोपपत्राद्वारे ठेवला.

टीआरपी घोटाळ्याप्रकरणी आतापर्यंत १५ आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यापैकी १२ आरोपींविरोधात याआधी आरोपपत्र दाखल करण्यात आले होते. सोमवारी पार्थ यांच्यासह 'बार्क'चे माजी मुख्य परिचलन अधिकारी रोमील रामगडिया आणि एआरजी आउटलायर कंपनीचे सीईओ विकास खानचंदानी यांच्याविरोधात गुन्हे शाखेने ३६०० पानांचे पुरवणी आरोपपत्र सादर केले. दासगुप्ता, रामगडिया यांची संशयास्पद कृ ती लक्षात आल्यानंतर 'बार्क'ने स्वतंत्र आस्थापनेकरवी टीआरपी मोजणीबाबत फॉरेन्सिक ऑडिट करून घेतले. त्याचा अहवाल आरोपपत्रात प्रमुख पुरावा म्हणून जोडण्यात आला आहे. या ऑडिटदरम्यान दासगुप्ता, रामगडिया यांनी वास्तवात टीआरपी अधिक असलेल्या इंग्रजी वृत्तवाहिनीस खाली खेचून रिपब्लिक वाहिनीस वरचढ ठरविण्यासाठी केलेली कृती, एआरजी कंपनीच्या (रिपब्लिक वाहिन्यांची प्रवर्तक कंपनी) संचालक, अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांमधील व्हॉट्सॲप, ई-मेलआधारित संवादही आरोपपत्रात पुरावा म्हणून जोडल्याचे वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

पार्थ यांनी एआरजीचे संचालक, रिपब्लिक वाहिन्यांचे मुख्य संपादक अर्णब यांच्याशी संगनमत केले, कट रचला, 'बार्क'मधील आपल्या पदाचा गैरवापर करून टीआरपी मोजणीची पद्धत, तंत्र बदलले. अन्य वरचढ ठरणाऱ्या वाहिन्यांचे टीआरपी विश्लेषणातून गाळले. विश्लेषण न करताच टीआरपी जाहीर करून रिपब्लिकला वरचढ ठरविले. प्रतिस्पर्धी वाहिन्यांची गुपिते रिपब्लिकसमोर फोडली, असे आरोप ठेवले आहेत.

**मनोरंजन वाहिन्यांवर लक्ष**

वृत्तवाहिन्यांसोबत सर्वसाधारण मनोरंजन वाहिन्या (जनरल एण्टरटेन्मेण्ट चॅनेल) आणि क्रीडा वाहिन्यांनीही टीआरपी वाढविण्यासाठी गैरमार्ग अवलंबल्याची माहिती पुढे आल्याचा दावा गुन्हे शाखेने केला. अशा १२ ते १३ वाहिन्या असून त्याबाबत तपास सुरू करण्यात आल्याचे गुन्हे शाखेच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. दोन दाक्षिणात्य वृत्त वाहिन्यांच्या चालक, मालकांकडेही चौकशी केली जाईल, असेही या अधिकाऱ्याने स्पष्ट केले.

**संशयितांचा शोध सुरू**

आरोपपत्रात एआरजी आउटलायरच्या सीओओ प्रिया मुखर्जी यांच्यासह रिपब्लिक वाहिन्यांशी संबंधित शिवा सुंदरम, शिवेंदू मुल्हेरकर, रणजीत वॉल्टर आणि अन्य व्यक्ती संशयित आरोपी असून त्यांचा शोध सुरू असल्याचे म्हटले आहे. फरारी आरोपींमध्ये महामूव्ही वाहिनीशी संबंधित दोघांचाही समावेश आहे.


**महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित**
(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)
दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव (पूर्व), मुंबई - ४०० ०६५.

**विधी व्यावसायिकांची नामतालिका (Panel) तयार करण्याबाबत.**

| | | |
|---|---|---|
| १. | कार्यालयाचे नाव | महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्या. गोरेगांव (पू), मुंबई - ४०००६५. |
| २. | पदनाम | विधी व्यावसायिक / सल्लागार नामतालिका |
| ३. | पदसंख्या | ०४ (२ उच्च न्यायालयीन प्रकरणांकरिता) (२ उच्च न्यायालयाशिवाय इतर न्यायालयीन प्रकरणांकरिता) |
| ४. | अर्ज उपलब्धतेचे ठिकाण | www.filmcitymumbai.org https://www.maharshtra.gov.in |
| ५. | अर्ज पाठविण्याचे ठिकाण | mdmfscdc@gmail.com |
| ६. | अर्ज स्वीकारण्याचा अंतिम दि. | ३०.०१.२०२१ |
| ७. | पदाचा अर्हता, अनुभव, अटी | वरील वेबसाईटवर दर्शविण्यात आले आहे. |
| ८. | उमेदवारांची निवड | मुलाखतीद्वारे केली जाईल. |
| ९. | वेतनमान / मानधन | इच्छुकांकडून देण्यात येणारे देकार वाटाघाटीअंती अंतिम केले जाईल. |

व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित


## मुंबईत उकाडा, थंडीच्या पुनरागमनाचा अंदाज

**मुंबई/पुणे :** गेल्या दोन दिवसांत कमाल तापमान आणि आर्द्रतेत झालेल्या वाढीमुळे सोमवारी शहर आणि उपनगरातील उकाड्यात वाढ झाली.

शुक्रवारी सुमारे तीन अंशांनी वाढलेले किमान तापमान तीन दिवस स्थिर आहे. तर शनिवारपासून कमाल तापमानात सुमारे चार अंश वाढ झाली. गेले चार दिवस किमान तापमान २० अंशापेक्षा आणि कमाल तापमान ३० अंशांपेक्षा अधिक नोंदविले जात आहे. सोमवारी कमाल तापमान कुलाबा येथे ३१.६ अंश आणि सांताक्रूझ येथे ३४.४० अंश राहिले. सोमवारी अनेक ठिकाणी आर्द्रतेचे प्रमाण अधिक असल्याने उकाडा वाढला होता. राज्यातील ढगाळ स्थिती निवळून रात्रीच्या किमान तापमानात हळूहळू घट होत जाणार आहे. मकर संक्रांतीपर्यंत थंडीसाठी पोषक स्थिती आहे.

# बेस्टमध्ये पाच वर्षांत ३० टक्के इलेक्ट्रिक बस

### पर्यावरणमंत्री आदित्य ठाकरे यांची घोषणा

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** वायू प्रदूषणाला आळा घालण्यासाठी राज्यात इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराला आणि हरित ऊर्जेच्या निर्मितीला चालना देण्यात येईल. मुंबईतील बेस्टमध्ये पुढील पाच वर्षांत साधारण ३० टक्के इलेक्ट्रिक बस आणण्याचा मानस पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांनी व्यक्त केला.

राज्य शासनाचा पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभाग आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे सोमवारी इलेक्ट्रिक वाहन तंत्रज्ञानाच्या दृष्टीने महाराष्ट्र वाहन धोरणामध्ये सुधारणा करण्यासाठी विविध भागधारकांसमवेत कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

एसटीमध्ये इंधनावर सुमारे ३ हजार कोटी रुपयांचा खर्च होतो. पण इलेक्ट्रिक बसेस वापरल्यास या खर्चात मोठी बचत होणार आहे. सध्या एसटी संकटात असून त्याला वाचविण्यासाठी 'गो ग्रीन'कडे वळल्याशिवाय पर्याय नाही. या अनुषंगाने येत्या काळात एसटीमध्येही इलेक्ट्रिक बसेसच्या वापराला चालना देण्यात येईल, असे परिवहन मंत्री अनिल परब यांनी सांगितले.


**महाराष्ट्र शासन**
**आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई**
दूरध्वनी क्र. : ०२२-२२६५१०२६/२२६३१८३१
ई-मेल : procurementcell@gmail.com
खरेदी कक्ष, १ला मजला, आरोग्य भवन, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, मुंबई - ४०० ००१.

**निविदा सूचना**

जाहिरात क्र. ५ दिनांक:- ०८/०१/२०२१
सहसंचालक आरोग्य सेवा, (खरेदी कक्ष) मुंबई हे आरोग्य विभागाअंतर्गत आरोग्य संस्थांना आवश्यक असणाऱ्या खालील बाबींकरिता विहित नमुन्यात दोन लिफाफा पध्दतीने ई-निविदा मागवित आहेत.

| अ. क्र. | निविदा क्रमांक | बाबीचे नाव | प्रकार | निविदापूर्व सभा | निविदा विक्री डाऊनलोड व सादर करण्याचा कालावधी | निविदा उघडण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ई-१९ | Printing of Safe Motherhood Booklet | निविदा विक्री कालावधी | दिनांक १५.०१.२०२१ दु. २.०० वा. | दि. १२.०१.२०२१ स.१०.०० ते दि. २५.०१.२०२१ दु. २.०० वा. पर्यंत | दिनांक २७.०१.२०२१ दुपारी २.०१ वा. |

१. अधिक माहितीसाठी इच्छुक निविदाधारक यांनी **website https://mahatenders.gov.in, arogya.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर संपर्क साधावा.
२. सहसंचालक आरोग्य सेवा (खरेदी कक्ष) मुंबई यांनी निविदेतील बाबीची संख्या कमी/अधिक करण्याचे आणि कोणतेही कारण न देता निविदा नाकारण्याचे अधिकार स्वत:कडे राखून ठेवले आहेत.

ई-निविदे बाबतच्या माहितीसाठी/मदतीसाठी कृपया खालील नमूद केल्याप्रमाणे संपर्क साधावा.
संकेतस्थळ :- https://mahatenders.gov.in
संपर्क क्रमांक : १८००-२३३-७३१५, ९१-७८७८१०७९८५, +९१-७८७८१०७९८६, +९१-७८७८००७९७२ आणि +९१-७८७८००७९७३
ई-मेल : eproc.support@maharashtra.gov.in

सही/-
सहसंचालक आरोग्य सेवा
(खरेदी कक्ष) मुंबई